# वसई विरार शहर महानगरपालिका
# वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.१२/०७/२०२४

## प्रेसनोट

वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत ११ जूलै ते २४ जूलै या कालावधीमध्ये **“जागतिक लोकसंख्या दिन”** साजरा करण्यात येत आहे. कुटुंब कल्याण कार्यक्रमाचा उददेश हा फक्त इच्छुक नसलेल्या गर्भधारणा टाळणे या करिता मर्यादित नसून माता व बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही महत्वाचा आहे. कुटुंब नियोजनाच्या सेवाच्या अनुपलब्धतेमुळे वाढणाऱ्या अनावश्यक गर्भधारणा, माता मृत्यु तसेच नवजात बालकांच्या आरोग्यावर होणारे नकारात्मक परिणाम टाळणे देखील महत्वाचे आहे.

११ जूलै हा एक दिवस “जागतिक लोकसंख्या दिन” म्हणून यावर्षीही साजरा करण्यात येत आहे. केद्रशासनाच्या सुचनेनुसार “जागतिक लोकसंख्या दिन २०२४” करिता यावर्षीच्या जागतिक लोकसंख्या दिनाची शीर्षक (थीम) -

**“माता आणि बाळाच्या निरोगी आरोग्यासाठी दोन अपत्यात योग्य अंतर ठेवा”**

यावर्षाच्या जागतिक लोकसंख्या दिनाचे घोषवाक्य -

**“ओळख नव्या विकसित भारताची कुटुंब नियोजन जबाबदारी प्रत्येक दाम्पत्याची.”**

- वसई विरार शहर महानगरपालिकामार्फत जागतिक लोकसंख्या कार्यक्रमानिमित्त १ जूलैपासून आजतागायत कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेचे (टाका व बिनटाका) शिबिर घेण्यात आले आहेत. या कार्यक्रमाला स्त्रीयांचा मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळालेला आहे. तसेच शस्त्रक्रिया झालेल्या लाभार्थ्यांना शासनाकडून रोख मानधन देण्यात येत आहे. यापुढेही महानगरपालिका रूग्णालयात या निमित्त शिबिर आयोजन करण्याचे योजिले आहे.

- **नियोजन –**
    - वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील ए.एन.एम व आशा मार्फत इच्छुक दामपत्यांना निरोध, ईसीपिल्स, ओसीपिल्स व छाया इत्यादींचे वितरण करण्यात येत आहे.
    - रुग्णालयामध्ये कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया (पुरूष व स्त्री नसबंदी) , तांबी बसविणे, इंजेक्शन अंतरा यासारख्या जास्त कालावधीच्या व कायमच्या पध्दती उपलब्ध आहे.
    - महानगरपालिकेच्या रूग्णालयामध्ये इच्छुक दामपत्यांना कुटुंब नियोजनाबाबत समुपदेशन करण्यात येत आहे.

वैद्यकीय आरोग्य विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका